ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# कृषी पर्यटन विकास

**डॉ. प्रवीण बबनराव आहेर**

*सहाय्यक प्राध्यापक,*

*नूतन कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राजापूर*

***Corresponding Author:* डॉ. प्रवीण बबनराव आहेर**

**DOI - 10.5281/zenodo.14875036**

**प्रस्तावना:**

भारताच्या ग्रामीण भागातील बहुसंख्य समाज उपजिविकेसाठी शेती क्षेत्रावर अवलंबून आहे .भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे .आज आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे, याचे कारण शासनाच्या शेती क्षेत्राच्या विकासाबाबत विविध योजना ,हरितक्रांती, विविध उपक्रम, कार्यक्रम यामुळे शेती क्षेत्राची प्रगती झाल्याचे दिसून येते. अलीकडच्या काळात शेती क्षेत्रातून फळे, फुले, भाजीपाला या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊन त्याची निर्यात केली जाते.तरीही भारतातील शेतकरी आपली स्वतःची फारशी आर्थिक प्रगती करू शकलेला नाही.तसेच ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करण्यातही फारसे यश मिळालेले नाही.यासाठीच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तसेच ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने कृषी पर्यटन अतिशय महत्त्वाचे आहे. देशातील नैसर्गिक सौंदर्य ऐतिहासिक व धार्मिक स्थळे सांस्कृतिक विविधता रानमेव्यांचे विविध प्रकार यामुळे देशातील व विदेशातील पर्यटकांच्या दृष्टीने कृषी पर्यटनाच्या विकासास उत्तम संधी उपलब्ध आहेत.त्या दृष्टीने महाराष्ट्रामध्ये 1 मे 2004 पासून कृषी पर्यटन या संकल्पनेचा प्रारंभ झाल्याचे दिसून येते.

**कृषी पर्यटन:**

कृषी पर्यटन म्हणजे शेतात आणि गावात फेरफटका मारणे, आपल्या संस्कृतीची ओळख करून घेणे, नैसर्गिक आनंद घेणे, शहरी जीवनशैलीचा कंटाळा आलेल्या लोकांनी दोन दिवस शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन राहणे व शेतकऱ्यांनी शहरी लोकांचा सशुल्क पाहुणचार, आदरतिथ्य करणे म्हणजे कृषी पर्यटन होय.

कृषी पर्यटन म्हणजे प्रत्यक्षात शेती कशी केली जाते,शेती कशी पिकवतात, शेतात कोणकोणती पिके कधी घेतात, शेतीची लागवड कधी आणि कशी केली जाते एकंदरीत ग्रामीण भागातील शेतीविषयक सर्व उपक्रम आणि कार्य जे शेतात चालतात आणि ते बहुतांश शहरी लोकांना वाचून आणि ऐकून माहिती असते पण प्रत्यक्षात शेतात जाऊन ते पाहणे, अनुभवने,स्वतः शेतात काम करणे आणि खऱ्या अर्थाने अनुभव घेऊन ग्रामीण जीवन जगण्याचा पर्याय कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष स्वअनुभव घेणे म्हणजे कृषी पर्यटन होय .

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

1) कृषी पर्यटन व्यवसायात असलेल्या संधी माहीत करून घेणे.
2) कृषी पर्यटनाचे महत्त्व समजावून घेणे.
3) कृषी पर्यटन या सेवा विपणनाचा अभ्यास करणे.
4) कृषी पर्यटनाच्या विकासासाठी विपणनाच्या दृष्टीने आवश्यक शिफारशी सुचवणे.



Scanned with OKEN Scanner

**संशोधन पद्धती:**

सदर शोध निबंध हा दुय्यम माहिती संकलनावर आधारित असून काही प्रमाणात कृषी पर्यटक, कृषी पर्यटन केंद्राचे संचालक, कृषी पर्यटन तज्ञ आणि या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या उपक्रमशील व्यक्ती यांच्याशी अनौपचारिक संवाद साधून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

कृषी पर्यटनाच्या विकासासाठी विपणनाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या शिफारशी सुचविण्याचा प्रयत्न संशोधनात करण्यात आलेला आहे.

**कृषी पर्यटन क्षेत्रातील संधी:**

कृषी व पर्यटन या दोन विभागांच्या समन्वयातून तयार झालेली कृषी पर्यटन ही पर्यटनाची नवीन संकल्पना मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास व त्याद्वारे राज्याचा विकास साधता येईल. शेतीतील जागेतच कृषी पर्यटन केंद्र उभारता येत असल्याने नवीन जागा शोधण्याची किंवा विकत घेण्याची गरज नाही शेतीतील पडीक गायरान आणि क्षारपड जमिनीचा योग्य वापराद्वारे त्यामधून शेतकऱ्यांना उत्पन्नाचे साधन प्राप्त होईल. कृषी पर्यटनातून शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठ व स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. परिसरातील लघुउद्योग, कुटीर उद्योग व बचत गटांना चालना मिळेल. ग्रामीण भागातील खाद्यपदार्थ, कलाकुसर लोककला, हस्तकला यांना प्रोत्साहन मिळून या उत्पादनांना स्थानिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध होईल. ग्रामीण भागातील लोककला,खाद्य संस्कृती, यात्रा उत्सव, परिसरातील पर्यटन वैभव यांचे जतन व संवर्धन होऊन त्यांचा सर्वदूर प्रचार- प्रसार होण्यास मदत मिळेल.या सर्वांमुळे शेतकऱ्यांचे व पर्यायाने ग्रामीण भागातील राहणीमान उंचावण्यास हातभार लागेल. शहरी भागातील पर्यटकांसाठी नवीन पर्यटन पर्याय उपलब्ध होऊन त्याद्वारे आर्थिक गुंतवणूक वाढेल. शहरी भागात दुर्मिळ असलेले निसर्ग सानिध्य सर्वांना उपभोगण्याची संधी उपलब्ध होईल.

**कृषी पर्यटनाचे महत्त्व:**

1. कृषी पर्यटन तरुणांना विशेषता ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते.
2. कृषी पर्यटन हे पारंपारिक ग्रामीण उत्पादनांसाठी बाजारपेठ वाढवते. काम करण्यासाठी मूल्यवर्धित पर्याय ऑफर करते आणि शेतकऱ्यांना त्यांच्या कमाईला चालना देण्यास आणि त्यांचे कृषी श्रम चालू ठेवण्यास अनुमती देते.
3. कृषी पर्यटनामुळे व्यवस्थापन कौशल्य आणि उद्योजकतेची भावना सुधारण्यास मदत होते.
4. कृषी पर्यटनामुळे ग्राहक बाजारपेठेत विकास होईल आणि परिणामी रोजगार वाढण्यास मदत होते.
5. कृषी पर्यटन अतिरिक्त शेती उत्पन्न मिळविण्याची उत्पादने आणि विपणनामध्ये विविधता आणण्याची, समुदायांमध्ये संबंध निर्माण करण्याची संधी देते.
6. कृषी पर्यटनामुळे शेतकरी कुटुंबातील बिनकामाच्या हातांना काम मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन ग्रामीण भारताचे जीवनमान उंचावेल.

**परिणामकारक कृषी पर्यटन विपणनासाठी महत्त्वपूर्ण घटक:**

1) गुणवत्तेस प्राधान्य- आपल्या कृषी पर्यटन केंद्राची चांगली प्रतिमा पर्यटकांच्या मनात तयार होण्यास मदत होण्यासाठी ज्वारीचा हुरडा, गव्हाचा हुरडा, मक्याचे कणीस, हरभरा इत्यादी बाबतीत तसेच डोंगरातील करवंदे, काळी मैना या रानमेळ्यांच्या बाबतीतही गुणवत्तेस प्राधान्य दिले पाहिजे एकूणच

परिणामकारक विपनणाचा पाया गुणवत्तेवरच अवलंबून असतो.

2) निसर्गरम्य धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा समावेश- कृषी पर्यटन सेवेमध्ये धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे या ठिकाणी पर्यटकांना सफर घडविण्याचा समावेश असावा. अशा प्रकारच्या विपणन प्रक्रियेमुळे कृषी पर्यटन सेवा सर्व प्रकारच्या व सर्व वयोगटातील पर्यटकांना आनंद देणारी ठरेल.

3) स्थानिक खेळ व मनोरंजन सेवेचा समावेश- कृषी पर्यटन सेवेमध्ये स्थानिक संस्कृतीदर्शक खेळ उदा- झिम्मा फुगडी, कबड्डी, आट्यापाट्या, विटी-दांडू या खेळांचा समावेश असला पाहिजे. तसेच लोकगीते, ओव्या,भजन,भारुड,गवळण इत्यादी प्रकारे मनोरंजन सेवेच्या सुविधाही कृषी पर्यटनामध्ये अभिप्रेत आहेत. या बाजू प्रभावीपणे विचारात घेतल्यास विपणन प्रक्रिया अधिक परिणामकारक होईल.

4) आवडीचे पॅकेज - कृषी पर्यटन सेवा विविध पॅकेज मध्ये उपलब्ध असावी. पर्यटकास आपल्या आवडीचे स्वातंत्र्य असावे. संपूर्ण पॅकेज घेण्याची सक्ती असू नये.पर्यटकांची आर्थिक क्षमता आणि आवडीनुसार त्यांना खाद्यान्न,खेळ,मनोरंजन याची निवड करता यावी.

5) इतर कृषी उत्पादकांशी संबंध- कृषी पर्यटकांना पर्यटना बरोबरच कृषी उत्पादनाची खरेदी करणे आवडते अशावेळी विविध प्रकारची फळे पालेभाज्या, रानभाज्या, रानमेव्यांचे विविध प्रकार सहजपणे उपलब्ध व्हावेत या उद्देशाने कृषी पर्यटन केंद्राशी व इतर कृषी उत्पादकांचे संबंध जोडणे उपयुक्त ठरते.

**निष्कर्ष:**

भारतातील कृषी पर्यटन चालकांच्या दृष्टीने कृषी पर्यटन व्यवसाय हा नवीन उपक्रम आहे. परंतु तो व्यवसाय सुरू करण्यापासून ते विपणन व्यवस्थेपर्यंतची पुरेशी माहिती त्यांना नसते. त्यामुळे त्यांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. इतर उपभोग्य सेवांच्या विपणनापेक्षा कृषी पर्यटन सेवेचे विपणन हे पूर्ण भिन्न असून या सेवेद्वारे ज्ञान,आनंद,मनोरंजन आणि समाधान देणे अभिप्रेत आहे. कृषी पर्यटन सेवेच्या विपणनामध्ये उपभोक्त्यांना समाधानी ठेवत असतानाच एक व्यवसाय म्हणून तो अविरतपणे चालावा, आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे याकडे लक्ष केंद्रित करावे. आज विविध भागात अनेक ठिकाणी कृषी पर्यटन केंद्रे सुरू झालेली आहेत. कृषी पर्यटन सेवेचे विपणन हे नैसर्गिक विविधता,सभोवतालची परिस्थिती आणि कृषी पर्यटन चालकांचे कौशल्य यावर अवलंबून आहे. परिणामकारक विपणन प्रक्रियेमुळे काही कृषी पर्यटन केंद्राचा प्रचार आणि प्रसार सर्वत्र होत आहे. सुरुवातीच्या काळात गुंतवणुकीवर पुरेसा मोबदला मिळत नाही. अनेक वेळा पर्यटकांचा प्रतिसाद वाढण्यास वेळ लागतो. ग्रामीण भागातील कृषी पर्यटन सेवक वर्ग हा संभाषण कौशल्य,माहितीची मांडणी, शिष्टाचार याबाबतीत कमी पडतो. त्यामुळे विपणन कार्य प्रभावीपणे होत नाही. तसेच कृषी पर्यटन केंद्रांची उभारणी करताना त्याचे आकारमान, पायाभूत सुविधा उपभोक्त्यांच्या अपेक्षा याबाबत कृषी पर्यटन केंद्र चालकांना पुरेशा प्रमाणात माहिती नसते.

**शिफारशी:**

1) शासनाचा कृषी विभाग आणि पर्यटन विभाग यांच्या पुढाकाराने कार्यशाळांचे आयोजन व्हावे त्यामुळे शेतीक्षेत्र व निवास आकारमान, पायाभूत सुविधा आणि संभाव्य उपभोक्त्यांच्या अपेक्षा याबाबत मार्गदर्शन होईल.

2) कृषी पर्यटन विपणनाच्या दृष्टीने पर्यटन केंद्राचा परवाना देताना शेतकरी समूह व सहकारी संस्था यांना प्राधान्य देण्यात यावे परिणामी प्रामाणिक मनुष्यबळ मिळेल. सहकारी संस्था किंवा शेतकरी समूह यामध्ये सदस्यांचे स्वतःचे हितसंबंध गुंतलेले असल्याने कृषी पर्यटकांमध्ये प्रामाणिकपणे आणि विश्वासहतेने सुविधा पुरविल्या जातील परिणामी पर्यटकांच्या भेटीत सातत्य राहील आणि कृषी पर्यटन विपणनाचे उद्दिष्ट साध्य होईल.
3) कृषी पर्यटनाच्या विकासासाठी संचालकापासून सेवकापर्यंत सर्वांना प्रशिक्षण देण्यात यावे. प्रामुख्याने ग्रामीण भागातील तरुण वर्ग सुशिक्षित असला तरी आपली संस्कृती परिसरातील विविध स्थळे याबाबत नेमकी आणि अचूक माहिती नसते संभाषण कौशल्याचीही कमतरता असते.अशावेळी परिणामकारक विपणनाच्या दृष्टीने प्रशिक्षण उपयुक्त ठरेल.
4) कृषी पर्यटन सेवेचा प्रचार प्रसार आणि जाणीव याबाबत प्रभावी जाहिरात कार्यक्रम हाती घेण्यात यावा. प्रचार प्रसार आणि जाहिरात यातील आर्थिक बोजासह सर्व बाबी सुरुवातीचा काही काळ शासनाने सहन करावा.
5) कृषी पर्यटन केंद्रापर्यंतची वाहतूक व्यवस्था सक्षम असली पाहिजे तसेच रस्ते चांगल्या दर्जाचे असावे याबाबत कृषी पर्यटन केंद्र चालक आणि शासन या दोन्ही घटकांनी लक्ष घालने आवश्यक आहे.

**संदर्भ:**

1) महाराष्ट्र शासनाचे कृषी पर्यटन धोरण,प्रेस नोट, पर्यटन संचालनालय,(DOT)महाराष्ट्र शासन दि. 3/02/2021
2) Maharashtra paryatan vistar Yojana, 2008, A.T.D.C., Pune.
3) www.conservationdevelopment.net
4) www.agritourism.in

D-12

Shikshan Prasarak Sanstha's

# Sangamner Nagarpalika Arts, D. J. Malpani Commerce and B. N. Sarda Science College (Autonomous), Sangamner, 422605

NAAC 3rd Cycle A+ Grade (CGPA 3.58), BEST COLLEGE AWARD by SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE

## Department of Economics and Research Centre

National Conference on

**Recent Trends in Economics, Commerce, Management, Banking, Finance & Insurance**

# CERTIFICAT

This is to certify that **Dr. Pravin Aher** of **NUTAN ARTS COMMERCE & SCIENCE COLLEGE RAJAPUR** has actively participated in **'One Day National Conference on Recent Trends in Economics, Commerce, Management, Banking, Finance & Insurance'** organized by **Department of Economics and Research Centre**, Sangamner Nagarpalika Arts, D. J. Malpani Commerce and B. N. Sarda Science College (Autonomous), Sangamner on 19th January 2025. He / She has presented paper entitled **कृषी पर्यटन विकास**

**Prof. (Dr) Gorakshanath Sanap**
Head of Department of Economics

**Prof. (Dr) Arun H. Gaikwad**
Principal

Scanned with OKEN Scanner